# निष्काळजीपणात पुणेकर आघाडीवर

## २७.२ टक्के पुणेकरांच्या घरांच्या किल्ल्या डोअरमॅटखाली

**पुणे :** घराच्या कुलपाची चावी दरवाज्याजवळ ठेवणे, मौल्यमान वस्तू लॉकरमध्ये न ठेवणे, शेजारी कोण राहतेय याची माहिती नसणे आदी सुरक्षाविषयक बाबींमध्ये पुणेकर मागे असल्याचे दिसून आले आहे. निष्काळजीपणाच्या बाबतीत पुणेकर आघाडीवर असल्याचे एका सर्वेक्षणात समोर आले आहे.

देशातील नागरिक घराच्या व वैयक्तिक सुरक्षेबाबत किती काळजी घेतात. यासाठी गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्सने सर्व्हे केला होता. त्यामध्ये पुणेकर सुरक्षेच्या बाबतीत बेफिकीर असल्याचे दिसून आले आहे. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या २७.२ टक्के लोकांनी असे मान्य केले की, बाहेर कुठे जायचे असल्यास घराची किल्ली डोअरमॅटखाली किंवा आजूबाजूलाच ठेवतात. तीन मिनिटांपेक्षा

### सर्वेक्षणात निष्काळजीपणा उघड

या सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी अर्ध्यापेक्षा जास्त लोकांनी (५२.३ टक्के ) असे मान्य केले की, ते त्यांच्या मौल्यवान वस्तू अधिक सुरक्षित तिजोऱ्या किंवा बँकेच्या लॉकरमध्ये ठेवण्याऐवजी कपाटात ठेवतात. ५३.५ टक्के लोक घरी काही वस्तू येणार असल्यास शेजारी किंवा वॉचमनवर अवलंबून असतात.

कमी वेळेसाठी घरातून बाहेर जायचे असल्यास घराच्या सर्व खिडक्या बंद करण्याची सवय फक्त ३५.१ टक्के लोकांना आहे, तर अशावेळी घराचा पुढचा दरवाजा कुलूप लावून बंद करण्याची सवय फक्त ३७.२ टक्के लोकांना आहे. या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या ७५ टक्के पुणेकरांनी सांगितले की, पैशाचे पाकीट हरवू शकते. हे पुण्यातील फक्त ३७ टक्के लोकांना वाटते. मौल्यवान वस्तू ठेवण्यासाठी केवळ ३० टक्के पुणेकर लॉकरचा उपयोग करतात. एकतृतियांशपेक्षा जास्त पुणेकर त्यांच्या काही शेजाऱ्यांनाच ओळखतात. परंतु फक्त १२.५ टक्के पुणेकर घरी काही वस्तू येणार असल्यास ती घेण्यासाठी शेजाऱ्यांवर अवलंबून राहू शकतात, तर फक्त १६ टक्के लोकांनी सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत, याची राष्ट्रीय सरासरी खूपच जास्त म्हणजे ४३ टक्के आहे.